Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ ।अंक १४५ ।पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

कारवाईनंतर साखरेच्या दरात तब्बल ३० टक्क्यांची घसरण!

(पान २ वर)



» Selected

## ई-पिक पाहणी नोंदणी शेतकरी स्तरावरच करा

भडगाव: ई-पिक पाहणीची नोंदणी करण्यासाठी शेतकऱ्यांना शासन नियुक्त सहाय्यकांमार्फत नोंदणी करून घ्यावी लागत असल्याने शेतकऱ्यांना अनावश्यक आर्थिक खर्चाचा सामना करावा लागत आहे. काही ठिकाणी ई-पिक पाहणीच्या नोंदणीसाठी शेतकऱ्यांकडून पैसे घेतल्याच्या तक्रारीही प्राप्त होत असल्याचा आरोप शेतकरी संघटनेने केला आहे. शेतकऱ्यांना पूर्वीप्रमाणे स्वतःच्या मोबाईलद्वारे ई-पिक पाहणीची नोंदणी करण्याची सुविधा पुन्हा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली. याबाबतचे निवेदन नायब तहसीलदार सुधीर सोनवणे यांना देण्यात आले. शेतकरी स्वतःच्या मोबाईलवरून आपल्या शेतातील पिकांची नोंद करू शकत असल्यास त्यांचा अनावश्यक खर्च वाचेल. तसेच संपूर्ण प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि शेतकरीहिताची होण्यास मदत होईल, असे संघटनेने निवेदनात म्हटले आहे.

### ऋतुजा पाटील अटकेत, नंदुरबारमध्ये मुंबई गुन्हे शाखेचा तपास तीव्र

# औषध निरीक्षक पेपरफुटीला नवे वळण!

## पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाला वेग; गेल्या सहा दिवसांत गुन्हे शाखेचे पथक तिसऱ्यांदा नंदुरबारमध्ये

जन सम्राट टाईम्स

**नंदुरबार । महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाचा तपास आता वेगाने पुढे सरकत आहे. मुंबई गुन्हे शाखेचे तपास पथक गेल्या सहा दिवसांत तिसऱ्यांदा नंदुरबारमध्ये दाखल झाले असून, प्रकरणातील संशयितांना सोबत आणून त्यांची चौकशी करण्यात येत आहे.**

दरम्यान, या कारवाईत ऋतुजा पाटील हिला नंदुरबारमधून अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.पेपरफुटी प्रकरणातील संशयितांच्या हालचाली, परस्पर संबंध आणि प्रश्नपत्रिका कथितरीत्या बाहेर जाण्यामागील संभाव्य साखळीचा शोध घेण्यावर गुन्हे शाखेचा भर आहे. तपास पथकाकडून नंदुरबारमधील संबंधित व्यक्ती आणि ठिकाणांची चौकशी तसेच पडताळणी केली जात आहे. त्यामुळे या प्रकरणात आणखी काही महत्त्वाचे धागेदोरे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तपासाची दिशा या प्रकरणात महाराष्ट्र लोकसेवा



आयोगात कार्यरत असलेल्या गोपाल मराठे यांच्या कथित सहभागामुळे तपासाला महत्त्वाचे वळण मिळाले आहे. मराठे हे मूळचे नंदुरबारचे रहिवासी असून, ज्या कौटिल्य अकॅडमीच्या माध्यमातून पेपरफुटी झाल्याचा आरोप केला जात आहे, त्या संस्थेचे ते माजी विद्यार्थी असल्याची माहिती तपासादरम्यान समोर आल्याचे सांगण्यात येते. गोपाल मराठे यांच्या कथित भूमिकेबाबत गुन्हे शाखेकडून सविस्तर तपास सुरू आहे. आयोगातील त्यांच्या पदाचा आणि जबाबदाऱ्यांचा प्रश्नपत्रिकेशी संबंधित माहितीपर्यंत संभाव्य प्रवेश होता का, तसेच अन्य संशयितांशी त्यांचे नेमके संबंध काय होते, याची पडताळणी केली जात आहे. या तपासातून पेपरफुटीची कथित साखळी स्पष्ट होण्याची शक्यता आहे. दरम्यान, हे कथित पेपरफुटी प्रकरण एका प्रेमसंबंधातील वादातून उघडकीस आल्याचा दावा तपासाच्या पार्श्वभूमीवर केला जात आहे. उपलब्ध माहितीनुसार, ऋतुजा पाटील हिचे वडील अमृत पाटील यांनी कौटिल्य अकॅडमीचे संचालक प्रवीण पाटील यांच्याकडून प्रश्नपत्रिका मिळवल्याचा आरोप आहे. प्रवीण पाटील यांनी एमपीएससीतील काही कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून प्रश्नपत्रिका मिळवल्याचा संशय तपास यंत्रणेकडून व्यक्त केला जात आहे. त्यानंतर अमृत पाटील यांनी कथितरीत्या ही प्रश्नपत्रिका मुलगी ऋतुजा हिला दिली. ऋतुजाने ती तिचा प्रियकर गौरव पाटील याला दिल्याचेही तपासात समोर आल्याचे सांगितले जाते. पुढे परीक्षा पार पडली. ऋतुजा पात्र ठरली; मात्र गौरव पात्र ठरला नसल्याचे सांगण्यात येते.

### अटकेमुळे तपासाला नवी दिशा

या प्रकरणात पोलिसांनी सुरुवातीला ऋतुजा पाटील हिला नोटीस बजावून चौकशीसाठी बोलावले होते. मात्र, पुढील तपासानंतर आता तिला अटक करण्यात आली आहे. तिच्या चौकशीतून प्रश्नपत्रिका कथितरीत्या कोणाकडून कोणाकडे पोहोचली, त्यामध्ये आणखी कोणाचा सहभाग होता आणि या प्रकरणामागील संपूर्ण साखळी काय आहे, याबाबत महत्त्वाची माहिती मिळण्याची शक्यता आहे. ऋतुजा पाटीलच्या अटकेनंतर मुंबई गुन्हे शाखेच्या पुढील कारवाईकडे लक्ष लागले आहे. या प्रकरणातील आरोपांची सत्यता आणि प्रत्येक संशयिताची नेमकी भूमिका तपासातून स्पष्ट होणार असून, दोषारोप न्यायालयीन प्रक्रियेत सिद्ध होणे बाकी आहे.

# नेपाळमध्ये मृतांचा आकडा हजारावर; शेकडो मृतदेहांची ओळख पटेना

## पुरानंतर परिस्थिती गंभीर; शवागृहांची क्षमता संपली, जंगलात सामूहिक दफनाची प्रक्रिया सुरू

जन सम्राट टाईम्स

**काठमांडू | प्रतिनिधी:** नेपाळमध्ये २६ ऑगस्ट रोजी आलेल्या भीषण पुरानंतर परिस्थिती अद्याप गंभीर आहे. विविध भागांतून एक हजारांहून अधिक मृतदेह सापडल्याची माहिती असून, जवळपास चार हजार नागरिक अद्याप बेपत्ता असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पुराच्या पाण्याचा जोर ओसरल्यानंतर आता चिखल, ढिगारे आणि उद्ध्वस्त झालेल्या वस्त्यांमधून मृतदेह बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. मात्र, अनेक मृतदेहांची ओळख पटवणे प्रशासनासाठी मोठे आव्हान ठरत आहे. पूरग्रस्त भागात मोठ्या प्रमाणावर मृतदेह सापडत असल्याने रुग्णालये आणि शवागृहांवरील ताण वाढला आहे. पाण्यात तसेच चिखलाखाली अनेक दिवस राहिल्यामुळे मृतदेहांची स्थिती खराब होत असून, त्यातून दुर्गंधी निर्माण होत आहे. त्यामुळे पूरग्रस्त भागात संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याची चिंता प्रशासनाकडून व्यक्त केली जात आहे. शवागृहांची क्षमता संपली नेपाळमधील अनेक पूरग्रस्त जिल्ह्यांमध्ये शवागृहांची क्षमता अपुरी पडत आहे. एकाच वेळी मोठ्या संख्येने मृतदेह आढळून येत असल्याने त्यांची सुरक्षितपणे जपणूक करणे कठीण बनले आहे. विशेषतः अज्ञात मृतदेह दीर्घकाळ सुरक्षित ठेवणे आव्हानात्मक ठरत आहे. अनेक मृतदेहांची ओळख पटलेली नसल्याने प्रशासनासमोर आणखी गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. उपलब्ध माहितीनुसार, आतापर्यंत सापडलेल्या हजाराहून अधिक मृतदेहांपैकी



अत्यल्प मृतदेहांचीच ओळख निश्चित झाली आहे. नातेवाईकांकडून बेपत्ता व्यक्तींचा शोध सुरू असतानाच प्रशासनाकडून मृतदेहांची नोंद, छायाचित्रण आणि नमुने संकलित करण्याचे काम केले जात आहे. जंगलांमध्ये सामूहिक दफन मृतदेहांची वाढती संख्या आणि त्यांची ओळख पटवण्यास लागणारा वेळ लक्षात घेता नेपाळ प्रशासनाने अज्ञात मृतदेहांच्या आपत्कालीन पद्धतीने सामूहिक दफनाची प्रक्रिया सुरू केल्याचे सांगण्यात येत आहे. शहरांपासून दूर असलेल्या भागांमध्ये, काही ठिकाणी जंगल परिसरात मोठे खड्डे तयार करून मृतदेह दफन केले जात आहेत. मात्र, हे मृतदेह कायमस्वरूपी कुटुंबीयांपासून दूर जाणार नाहीत, याचीही प्रशासनाकडून काळजी घेतली जात आहे. दफन करण्यापूर्वी प्रत्येक मृतदेहाचा डीएनए नमुना, छायाचित्र आणि ओळख पटवण्यासाठी आवश्यक इतर पुरावे संकलित केले जात आहेत. भविष्यात डीएनए चाचणी किंवा उपलब्ध पुराव्यांच्या आधारे मृतांची ओळख पटल्यास त्यांच्या कुटुंबीयांना अवशेष सुपूर्द करण्याची व्यवस्था करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. हिमकडा तुटल्याने नद्यांना पूर? नेपाळ-तिबेट सीमावर्ती भागात हिमकडा तुटल्यामुळे भोटे कोशी आणि त्रिशूली नद्यांच्या पाणीपातळीत अचानक वाढ झाल्याने पूरस्थिती निर्माण झाल्याचा दावा करण्यात येत आहे.

## जळगाव पोलिसांची कामगिरी: ५ तासांत चोरीचा गुन्हा उघडकीस

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव शहरातील शाहूनगर परिसरातील शाहू कॉम्प्लेक्स येथे ६२ वर्षीय नागरिकाच्या खिशातून १२ हजार ५०० रुपयांची रोकड चोरी करणाऱ्या संशयितांना जळगाव शहर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने अवघ्या पाच तासांत ताब्यात घेतले. या कारवाईत दोन प्रौढ आरोपींना अटक करण्यात आली असून एका विधी संघर्षित बालकास कायदेशीर प्रक्रियेनुसार ताब्यात घेण्यात आले आहे. संशयितांकडून चोरीच्या रकमेपैकी १२ हजार रुपये हस्तगत करण्यात आले आहेत. दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ ते ४.३० वाजेदरम्यान फिर्यादी अनिल राजमल कासट (वय ६२, रा. म्हाडा कॉलनी, एमआयडीसी, जळगाव) हे शाहू कॉम्प्लेक्स येथे असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या पॅन्टच्या खिशातील १२ हजार ५०० रुपये चोरून नेले होते. याप्रकरणी जळगाव शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सीसीटीव्ही आणि खबऱ्यांच्या माहितीने आरोपी जेरबंद गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावीत आणि उपविभागीय पोलीस



अधिकारी नितीन गणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सागर शिंपी यांनी विशेष गुन्हे शोध पथक तयार केले. पथकाने गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण करून संशयितांचा माग काढला. त्यानंतर गेंदालाल मिल परिसरातून तिघांना ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेण्यात आलेल्यांमध्ये शहीदखान नजीरखान (वय २७, रा. गेंदालाल मिल, जळगाव), समीर खान मजीदखान (वय ३७, रा. गेंदालाल मिल, जळगाव) आणि एका विधी संघर्षित बालकाचा समावेश आहे. चौकशीत चोरीबाबत माहिती मिळाल्यानंतर दोन्ही प्रौढ आरोपींना अटक करण्यात आली असून बालकास कायदेशीर प्रक्रियेनुसार ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपींकडून चोरीच्या रकमेपैकी १२,००० रुपये रोख हस्तगत करण्यात आले. या कारवाईत पोलीस निरीक्षक सागर शिंपी,जीपीएसआय सुनील पाटील, सफौ दीपक शिरसाट तसेच गुन्हे शोध पथकातील अंमलदारांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## शिवसेना पक्ष आणि चिन्हावर आज सुप्रीम कोर्टात सुनावणी

**मुंबई :** शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात आज दुपारी 2 नंतर पुन्हा सुनावणी होणार आहे. ठाकरे गटाकडून कपिल सिब्बल आणि देवदत्त कामत यांच्या जोरदार युक्तिवादानंतर आजपासून शिंदे गटाकडून युक्तीवादाला सुरुवात होणार आहे. पक्षाची बाजू आणि पुरावे भक्कम रीतीने मांडण्यासाठी सर्व वकिलांशी आणि कायदे तज्ञांशी चर्चा केली. त्यामुळेच हा युक्तिवाद करत असताना पक्षाची बाजू आणि पुरावे भक्कम रीतीने मांडण्यासाठी काल दिल्लीत एकनाथ शिंदे सर्व वकिलांशी आणि कायदे तज्ञांशी चर्चा केली.

# जाती-भटक्या जमातींनी तंत्रज्ञान व स्वयंरोजगारातून प्रगती साधावी

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** विमुक्त जाती व भटक्या जमाती दिनानिमित्त ग्रामपंचायत कानळदा यांच्या वतीने गावातील VJNT प्रवर्गातील विविध समाजांच्या प्रतिनिधींना ग्रामपंचायत कार्यालयात एकत्रित करून मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शिक्षण, सामाजिक सन्मान, विकास, महिला सक्षमीकरण, रोजगार आणि पारंपरिक व्यवसायांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन समाजाने प्रगतीच्या मुख्य प्रवाहात यावे, असे आवाहन सरपंच पुंडलिक सपकाळे यांनी केले. कार्यक्रमात बोलताना सरपंच पुंडलिक सपकाळे म्हणाले की, विमुक्त जाती व भटक्या जमातींचा इतिहास हा संघर्षाचा आणि कष्टाचा आहे. या समाजातील बांधवांनी प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या पारंपरिक कला, कौशल्य आणि व्यवसाय जपले आहेत. आजच्या काळात या पारंपरिक कौशल्यांना आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि बाजारपेठेची जोड दिल्यास रोजगार व स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होऊ शकतात. “सहानुभूतीपेक्षा संधी आणि आश्वासनांपेक्षा अधिकारांची माहिती समाजाला आवश्यक आहे,” असे सांगत त्यांनी शिक्षणाला परिवर्तनाचे सर्वात प्रभावी माध्यम असल्याचे स्पष्ट केले. समाजातील प्रत्येक मुला-मुलीने शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहावे, तसेच पालकांनी



मुलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. महिलांच्या सक्षमीकरणावरही सरपंच सपकाळे यांनी विशेष भर दिला. महिलांनी बचत गटांमध्ये सहभागी होऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, स्वयंरोजगार व लघुउद्योगांकडे वळावे आणि ग्रामविकासाच्या निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे त्यांनी सांगितले. युवकांनी कौशल्य विकास, डिजिटल तंत्रज्ञान, स्पर्धा परीक्षा, रोजगार व उद्योजकतेच्या संधींचा लाभ घ्यावा. पारंपरिक व्यवसाय आधुनिक पद्धतीने विकसित करून त्यांना बाजारपेठेशी जोडण्याचा प्रयत्न करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच युवकांनी व्यसनांपासून दूर राहून “व्यसनमुक्त युवक, सक्षम कुटुंब आणि समृद्ध गाव” हा संकल्प करण्याचे आवाहन केले. ग्रामपंचायत ही केवळ मूलभूत सुविधा पुरवणारी संस्था नसून गावातील प्रत्येक घटकाच्या विकासाची जबाबदारी घेणारी लोकशाहीची स्थानिक संस्था आहे. गावातील VJNT समाजातील पात्र कुटुंबांना शासकीय योजना, शैक्षणिक सुविधा, आवश्यक कागदपत्रे, घरकुल, रोजगार व कौशल्य विकासाच्या योजनांची माहिती मिळवून देण्यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील, असे सरपंचांनी सांगितले. “गावाचा विकास तेव्हाच खरा विकास म्हणता येईल.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# 'आरक्षणापासून एक इंचही मागे हटणार नाही'

## जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांच्याशी बोलताना जरांगेंच्या डोळ्यात अश्रू!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी अंतरवली सराटी येथे उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा आज चौथा दिवस असून जालन्यात मोठ्या राजकीय व प्रशासकीय घडामोडी घडत आहेत. सलग चार दिवसांपासून उपोषणाला बसल्यामुळे मनोज जरांगे यांची प्रकृती खालावली आहे, तरीही ते आंदोलनावर ठाम आहेत. अशातच शासकीय अधिकाऱ्यांचे एक शिष्टमंडळ जरांगेंशी चर्चा करण्यासाठी अंतरवली सराटीत दाखल झाले. यावेळी जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांच्याशी संवाद साधताना मनोज



जरांगे अत्यंत भावूक झाले आणि त्यांच्या डोळ्यातून अश्रू आल्याचं दिसून आलं. जिल्हाधिकाऱ्यांशी बोलताना मनोज जरांगे म्हणाले, "कलेक्टर मॅडम, तुम्ही आलात पण या गोष्टी तुमच्या स्तरावरील नाहीत. या सर्व मागण्या राज्यस्तरीय आहेत. सरकार तुम्हाला उगाच पुढे करत आहे. या मागण्यांशी तुमचा थेट संबंध नाही, त्यामुळे तुमची एनर्जी वाया घालवू नका.

मी तुमचा सन्मान करतो, पण मी तुमचे ऐकणार नाही. यानंतर तुम्ही येऊ नका."आपली व्यथा मांडताना जरांगे पुढे म्हणाले, "समाजाच्या लेकरांचे वाटोळे होत आहे. एका दिवसात शिबिर लागू शकते, मग यांना चार महिने कशाला हवेत? सातारा आणि कोल्हापूर संस्थानांचे गॅझेट तात्काळ लागू करून सकाळीच जीआर काढा. आंतरवली सराटीमधील गुन्हे मागे घ्यायचे नसतील तर समोरच्यांवर गुन्हे दाखल करा. मी या उपोषणापासून एक इंचही मागे सरकू शकत नाही. सरकारने आता वेळकाढूपणा थांबवून मागण्या मान्य कराव्यात आणि त्यांची अंमलबजावणी करावी.

"जालन्याच्या जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांनी जरांगे यांच्याशी प्राथमिक चर्चा केल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या, "प्रशासन म्हणून आमच्या काही मर्यादा आहेत. 58 लाख नोंदी असलेला डेटा आम्ही येथे आणला आहे.

मनोज जरांगे यांची प्रकृती खालावल्याने त्यांनी कृपया उपोषण सोडावे आणि किमान पाणी तरी घ्यावे, अशी मी विनंती करते. संवैधानिक मर्यादा पाळून जे करणे शक्य आहे ते सर्व करण्यास शासन कटिबद्ध आहे आणि आमचा संवाद पुढेही सुरूच राहील."दरम्यान, मराठा आंदोलकांनी मुंबईच्या दिशेने कूच करण्यास सुरुवात केली आहे. अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा झाल्यानंतर आता शासनाचे मंत्र्यांचे शिष्टमंडळ आंतरवलीत येण्याची शक्यता आहे. या शिष्टमंडळात उद्योगमंत्री उदय सामंत, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि मकरंद आबा पाटील यांचा समावेश आहे. मनोज जरांगे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्यास मंत्र्यांचे हे पथक आंतरवली सराटीत जाऊन जरांगे यांचे उपोषण सोडवणार असल्याची माहिती समोर येत आहे.



# संघवी इंटरनॅशनल स्कूलमध्ये भटके-विमुक्त जाती-जमाती दिन उत्साहात साजरा

## “भारतीय इतिहासात भटक्या-विमुक्त जातींचे मोलाचे योगदान

जन सम्राट टाईम्स

**एरंडोल, उत्राण | प्रतिनिधी :** श्री सुरेशचंद बी. संघवी इंटरनॅशनल स्कूलमध्ये ३१ ऑगस्ट रोजी भटके-विमुक्त जाती-जमाती दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमासह चित्रकला आणि निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे चेअरमन देवमन माळी होते, तर प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून ॲड. रवींद्र गजरे उपस्थित होते. प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, महान योद्धे महाराणा प्रताप, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, संत सेवालाल महाराज आणि राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करून पूजन करण्यात आले. “भटक्या-विमुक्त समाजाचे इतिहासातील योगदान महत्त्वाचे” यावेळी शिक्षक भागवत माळी यांनी भटके-विमुक्त जाती-जमातींच्या सामाजिक व सांस्कृतिक वाटचालीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रमुख वक्ते ॲड. रवींद्र गजरे यांनी भटक्या-विमुक्त समाजाशी संबंधित महापुरुषांचा इतिहास विद्यार्थ्यांसमोर मांडला.

भारतीय इतिहासाच्या जडणघडणीत भटक्या-विमुक्त जाती-जमातींचे मोलाचे योगदान आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. भटक्या-विमुक्त समाजातील विविध घटक, त्यांच्या



पारंपरिक व्यवसायपद्धती, परंपरा आणि संस्कृती यांचे त्यांनी विस्तृत विवेचन केले.

या समाजाच्या इतिहासाचा आणि योगदानाचा विद्यार्थ्यांनी अभ्यास करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी शासकीय योजनांचा लाभ घ्यावा अध्यक्षीय भाषणात चेअरमन देवमन माळी यांनी शाळेत शिक्षण घेत असलेल्या धनगर समाजातील तसेच इतर विद्यार्थ्यांनी शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांचा लाभ घेऊन आपली शैक्षणिक प्रगती साधावी, असे आवाहन केले. भटके-विमुक्त जाती-जमातींसाठी शासनाकडून विविध शिष्यवृत्ती आणि कल्याणकारी योजना राबविण्यात येत असून, या योजनांचा लाभ घेऊन समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून मुख्य प्रवाहात यावे, असे त्यांनी सांगितले. शाळेच्या सचिव शीतल माळी यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाचे कौतुक करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. चित्रकला, निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग भटके-विमुक्त जाती-जमाती दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व निबंध स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले.

या उपक्रमासाठी शीतल ठाकूर आणि राहुल सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भूषण जाधव यांनी केले. यावेळी गणेश महाजन, बुद्धभूषण निकम, राहुल सोनवणे, धनंजय तिवारी, सनी राठोड, निखिल चौधरी, रविकांत मालचे, विजेंद्र सोनार, दिनेश माळी, सागर म्हात्रे, हिना शेख, लीना पाटील, रेणू बिर्ला, मयुरी बिर्ला, नीलिमा कासार, सुरेखा पाटील, शुभांगी पाटील, शीतल ठाकूर, धनश्री महाजन, मोहिनी कुंवर, जया कोळी, मीना चिंचोरे, राजश्री मराठे, नेहा राजपूत, मोरे, वर्षा पाटील आदी शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षकेतर कर्मचारी ज्ञानेश्वर भदाणे, भूषण चौधरी, जगन्नाथ फराटे, आत्माराम सोनगीरे, चंदू रल, किरण घोडेस्वार, गुणवंत पाटील, रोहित कोळी आणि शिवदास महाजन यांनी सहकार्य केले.

# 'परी' येथील रेशन दुकानाचा सावळा गोंधळ!

जन सम्राट टाईम्स

**शहादा | प्रतिनिधी:** शासनाकडून गोरगरीब, गरजू जनतेसाठी सुरू करण्यात आलेल्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेला शहादा तालुक्यातील परी येथे रेशन दुकानदाराकडून हरताळ फासला जात असल्याचे समोर आले आहे. लाभार्थ्यांना नियमानुसार धान्याचे वाटप न करणे,अंत्योदय योजनेच्या धान्यात परस्पर कपात करणे आणि हक्काची साखर गायब करणे असा गंभीर प्रकार येथे सुरू आहे. या संदर्भात ग्रामस्थांनी अधिकृत तक्रार देऊन महिना उलटून गेला तरी पुरवठा विभागाकडून कोणतीही ठोस चौकशी झालेली नाही. त्यामुळे शहादा पुरवठा विभाग नेमका कुणाच्या दबावाखाली काम करतोय, असा संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. शासनाच्या नियमानुसार प्रत्येक युनिटनुसार योग्य ते धान्य मिळणे आवश्यक असताना लाभार्थ्यांच्या पदरात कमी धान्य पाडले जात आहे. अंत्योदय कार्डधारकांना दरमहा ३५ किलो शिधा देणे बंधनकारक असताना त्यांनाही पुरेसे धान्य दिले जात नाही. लाभार्थ्यांना मिळणारी एक किलो साखर सर्रासपणे गायब केली जात असल्याचा थेट आरोप नागरिकांनी केला आहे. पारदर्शकता राखण्यासाठी दुकानाबाहेर धान्याचा साठा, दर आणि उपलब्धतेचे फलक लावणे बंधनकारक असताना येथे असे कोणतेही फलक लावलेले नाहीत. गावातील दक्षता समितीची नियमित बैठक घेऊन वितरण व्यवस्थेवर देखरेख ठेवणे गरजेचे असताना, येथे कोणतीही बैठक घेतली जात नाही. परी येथील रेशन दुकानातील गैरव्यवहाराबाबत ग्रामस्थांनी लेखी तक्रार नोंदवून एक महिना उलटला आहे. मात्र, अद्याप पुरवठा विभागाच्या एकाही जबाबदार अधिकाऱ्याने गावात जाऊन प्रत्यक्ष पंचनामा किंवा चौकशी केलेली नाही. सर्व नियम धाब्यावर बसवले जात असतानाही पुरवठा विभाग 'सर्व काही अलबेल' असल्याचा आव आणत आहे. यावरून संबंधित दुकानदाराला वाचवण्याचाच प्रयत्न प्रशासनाकडून सुरू आहे का,अशी तीव्र शंका उपस्थित होत आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# ग्रामसभेला पोलिस बंदोबस्त द्या; अन्यथा ग्रामसभा रद्द करा

## धुळ्यात ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा मोर्चा



जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** ग्राम सभेदरम्यान ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी पुरेसा पोलिस बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा, अन्यथा ग्रामसभा रद्द करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या वतीने धुळ्यात मोर्चा काढण्यात आला. कल्याण भवन येथून सुरू झालेला हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचला. यावेळी युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन साद केले. हातात विविध मागण्यांचे फलक घेऊन ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले होते.

ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांना मानसिक व शारीरिक त्रास झाल्यानंतर हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले होते. या घटनेनंतर धुळे जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांमध्ये तीव्र संतापासह भीती आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळावे आणि त्यांच्या जीविताचे संरक्षण व्हावे, यासाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला. भविष्यात ग्रामसभा आयोजित करताना ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षेसाठी पुरेसा पोलिस बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा; बंदोबस्त उपलब्ध न झाल्यास ग्रामसभा घेण्यास परवानगी देऊ नये, अशी मागणी यावेळी करण्यात आली. मोर्चात युनियनचे अध्यक्ष प्रफुल्ल शिंदे, चेतन पाटील, आबा पवार, आर. ए. पाटील, एच. एन. अहिरे, विजय सैंदाणे, रोहिणी देसले, गीता बैरागी, सारिका परदेशी, पूनम शिंदे यांच्यासह जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्राम सभेदरम्यान ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी पुरेसा पोलिस बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा, अन्यथा ग्रामसभा रद्द करण्यात यावी, महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या वतीने धुळ्यात मोर्चा काढण्यात आला. कल्याण भवन येथून सुरू झालेला हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचला. यावेळी युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन साद केले. हातात विविध मागण्यांचे फलक घेऊन ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले होते.

# कारवाईनंतर साखरेच्या दरात तब्बल ३० टक्क्यांची घसरण!

## कारखाना दर ६७ वरून ४७ रुपये किलो;

जन सम्राट टाईम्स

**रावेर। प्रतिनिधी:** सरकारच्या कारवाईनंतर साखरेच्या दरात मोठी घसरण झाली असून, अवघ्या काही दिवसांत कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या साखरेच्या दरात जवळपास ३० टक्क्यांची घट झाली आहे. मात्र, कारखाना आणि घाऊक बाजारातील दर कमी झाले असले तरी त्याचा थेट फायदा अद्याप किरकोळ ग्राहकांना मिळालेला नाही. मिळालेल्या माहितीनुसार, १८ ऑगस्ट रोजी कारखान्यातील साखरेचा दर ६७ रुपये प्रति किलो होता. सोमवारी हा दर घसरून ४७ रुपये प्रति किलोवर आला आहे. त्यामुळे साखरेच्या दरात मोठी घट झाल्याचे चित्र आहे. किरकोळ बाजारात मात्र साखर अजूनही महाग कारखाना आणि घाऊक बाजारातील दर कमी झाले असले तरी किरकोळ बाजारात साखरेचा भाव अद्याप ६० रुपये प्रति किलोपेक्षा अधिक आहे. रविवारी किरकोळ बाजारात साखरेची विक्री ६४.२३ रुपये प्रति किलो, तर घाऊक



बाजारातील दर ५९.७२ रुपये प्रति किलो होता. त्यामुळे घाऊक आणि कारखाना पातळीवर दर कमी होत असताना किरकोळ बाजारात त्याचा परिणाम तत्काळ का दिसत नाही, असा प्रश्न ग्राहकांकडून उपस्थित होत आहे. जुन्या साठ्यामुळे दर कमी होण्यास विलंब व्यापाऱ्यांकडे पूर्वीच्या तुलनेने जास्त दराने खरेदी केलेला साखरेचा साठा असल्याने तो कमी दरात विकल्यास नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्याचा जुना साठा संपेपर्यंत अनेक किरकोळ विक्रेते जुन्याच दराने साखर विक्री करत राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नवीन साठा कमी दरात खरेदी केल्यानंतरच त्याचा परिणाम किरकोळ बाजारातील किमतीवर दिसून येण्याची शक्यता आहे. ग्राहकांना दिलासा मिळण्यासाठी आणखी दहा दिवस? साखरेच्या किरकोळ दरात प्रत्यक्ष घट दिसून येण्यासाठी किमान १० दिवसांचा कालावधी लागू शकतो, अशी माहिती बाजारातील सूत्रांकडून मिळत आहे. त्यामुळे आगामी काही दिवसांत किरकोळ बाजारातील साखरेचे दर कमी होतात का, याकडे ग्राहकांचे लक्ष लागले आहे. कारखाना दरातील मोठी घसरण किरकोळ बाजारात कधी आणि किती प्रमाणात प्रतिबिंबित होते, यावर ग्राहकांना मिळणारा प्रत्यक्ष दिलासा अवलंबून राहणार आहे.

# ग.स. बँकेच्या निवडणुकीत लोकमान्य पॅनलचा दणदणीत विजय!

## २१ पैकी २१ जागांवर वर्चस्व; निशांत रंधे पुन्हा एकदा ‘किंगमेकर’;

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** धुळे व नंदुरबार जिल्हा सरकारी नोकरांची बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग.स. बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत लोकमान्य पॅनलने दणदणीत विजय मिळवत पुन्हा एकदा आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. २१ पैकी २१ जागांवर विजय मिळवत लोकमान्य पॅनलने खऱ्या अर्थाने ‘लोकमान्यता’ मिळवल्याचे चित्र निवडणूक निकालातून स्पष्ट झाले आहे. या संपूर्ण निवडणुकीत प्रभावी जनसंपर्क आणि नियोजनबद्ध प्रचाराच्या माध्यमातून पॅनलच्या विजयासाठी परिश्रम घेणारे गटनेते निशांत रंधे हे पुन्हा एकदा ‘किंगमेकर’ ठरल्याची चर्चा बँकिंग वर्तुळात सुरू झाली आहे. “येणाऱ्या काळात सभासदांच्या हिताला प्राधान्य देत बँकेचा कारभार अधिक सक्षम आणि यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले जातील,” अशी प्रतिक्रिया लोकमान्य पॅनलचे गटनेते निशांत रंधे यांनी दिली. २१ पैकी २१ जागांवर लोकमान्यांचा झेंडा ग.स. बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत एकूण २१ जागांसाठी निवडणूक




कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. त्यापैकी लोकमान्य पॅनलच्या पाच जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या होत्या. त्यामुळे उर्वरित १६ जागांसाठी मतदान घेण्यात आले. या १६ जागांसाठी झालेल्या मतदानातही मतदारांनी पुन्हा एकदा लोकमान्य पॅनलवर विश्वास व्यक्त केला. १६ पैकी १६ जागांवर लोकमान्य पॅनलच्या उमेदवारांनी विजय मिळवत विरोधकांना मोठा धक्का दिला. बिनविरोध पाच जागांसह पॅनलने सर्व २१ जागांवर विजय मिळवला. मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच लोकमान्यांचा बोलबाला शहरातील अग्रवाल विश्राम भवन येथे आज दुपारी मतमोजणीला सुरुवात झाली. मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच लोकमान्य पॅनलच्या उमेदवारांची आघाडी दिसून येत होती. प्रत्येक फेरीत लोकमान्य पॅनलच्या उमेदवारांचा विजयाचा कल कायम राहिला. अखेर १६ जागांचा निकाल जाहीर झाल्यानंतर १६ पैकी १६ जागांवर लोकमान्य पॅनल विजयी झाल्याचे स्पष्ट झाले. या निकालामुळे विरोधकांना मोठा राजकीय धक्का बसला असून, लोकमान्य पॅनलचे बँकेवरील वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. फटाक्यांची आतषबाजी; गुलालाची उधळण निकाल जाहीर होताच लोकमान्य पॅनलच्या समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी आणि गुलालाची उधळण करत जल्लोष साजरा केला. विजयी उमेदवार व पदाधिकाऱ्यांचे समर्थकांकडून अभिनंदन करण्यात आले. या विजयानंतर बँकेच्या आगामी कारभाराबाबत सभासदांच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. निवडणुकीतील विजयाचे रूपांतर बँकेच्या प्रगतीत करण्याचे आव्हान आता लोकमान्य पॅनलसमोर असणार आहे

# मैत्रीय बुद्ध विहारात धम्म वर्षावास प्रवचन मालिकेचे ८वे पुष्प संपन्न

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ। प्रतिनिधी:** भारतीय बौद्ध महासभेच्या अंतर्गत मैत्रीय बुद्ध विहार, भुसावळ येथे भारतीय बौद्ध महासभा जळगाव पूर्व महिला शाखेच्या वतीने आयोजित राष्ट्रीय धम्म वर्षावास प्रवचन मालिकेचे ८वे पुष्प उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभा जळगाव पूर्व महिला शाखेच्या जिल्हाध्यक्ष प्रियंकाताई अहिरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात केंद्रीय शिक्षिका आऊमा.नी. ज्योतीताई भालेराव यांनी ‘डॉ. आंबेडकरांचे क्रांतीलढे’ या विषयावर प्रवचनातून उपस्थितांना मार्गदर्शन केले. ‘क्रांतीलढे’ विषयावर प्रभावी विवेचन आऊमा.नी. ज्योतीताई भालेराव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि परिवर्तनवादी चळवळीचा बाबासाहेबांनी सामाजिक विषमता, अन्याय आणि अस्पृश्यतेविरोधात उभारलेल्या संघर्षाचे विविध पैलू त्यांनी स्पष्ट केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा समाजाने स्वीकार करून त्यांची शिकवण



पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून अधोरेखित केले.शहर संघटक आयु.नी. प्रतिभाताई शिरतूरे, आयु.नी. शोभाताई घायतडक, आयु.नी. सुजाताताई जंजाळे, आयु.नी. मायाताई निकम, आयु.नी. सीमाताई बावस्कर, आयुष्यमानी शिल्पाताई गायकवाड, आयु.नी. वैशालीताई जंजाळे, आयु.नी. वंदनाताई शेजवळ, आयु.मा. मोटे, आयु.मा. लोखंडेताई, आयु.मा. भालेरावताई यांच्यासह असंख्य उपासिका तसेच बालक-बालिकांची उपस्थिती होती. राष्ट्रीय धम्म वर्षावास प्रवचन मालिकेच्या माध्यमातून धम्मविचार, सामाजिक प्रबोधन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारांचा प्रसार करण्याचा उपक्रम सुरू असून, या ८व्या पुष्पालाही उपासक-उपासिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# कागदोपत्री ५० कर्मचारी, प्रत्यक्षात केवळ पाच!



जन सम्राट टाईम्स

**धुळे| प्रतिनिधी:** धुळे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील सफाई कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती आणि कामकाजावरून महासभेत चांगलाच गदारोळ झाला. कागदोपत्री ५० कर्मचारी उपलब्ध असल्याचे दाखविले जाते; केवळ पाच कर्मचारी स्वच्छतेचे काम करत असल्याचा गंभीर आरोप एमआयएमचे नगरसेवक जावेद बिल्डर यांनी केला. या प्रकारामुळे आरोग्य विभागाच्या कारभारावर आणि कथित आर्थिक अनियमिततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. यावेळी जावेद बिल्डर यांनी आरोग्य विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू असल्याचा आरोप करत नागरिकांच्या पैशांची लूट थांबवून प्रत्यक्षात स्वच्छतेचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या आणि उपस्थिती तपासावी, अशी मागणी केली. “कर्मचारी कागदावर, काम मात्र मोजक्यांकडून!” महानगरपालिकेच्या विविध प्रभागांमध्ये सफाई कर्मचाऱ्यांमार्फत स्वच्छतेचे काम केले जाते. मात्र, अनेक ठिकाणी कागदोपत्री मोठ्या संख्येने कर्मचारी दाखविले जात असले तरी प्रत्यक्ष कामावर अत्यल्प कर्मचारी उपस्थित राहत असल्याचा दावा नगरसेवक बिल्डर यांनी केला. कर्मचाऱ्यांची हजेरी, प्रत्यक्ष कामावर उपस्थिती आणि त्यानुसार होणारे वेतन यामध्ये पारदर्शकता आणण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी महासभेत सांगितले. आयुक्तांचीही दादागिरीची कबुली? नगरसेवकांच्या आरोपांना उत्तर देताना मनपा आयुक्त नितीन कापडणीस यांनी काही सफाई कर्मचारी दादागिरी करत असल्याचे सांगितल्याचे नमूद करण्यात आले. कर्मचाऱ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी लवकरच ॲप तयार करण्यात येणार असून, कामावर उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांचे फोटो त्यावर अपलोड केले जातील, अशी माहिती आयुक्तांनी दिली. या उपाययोजनेमुळे कागदोपत्री हजेरी आणि प्रत्यक्ष उपस्थितीतील फरक स्पष्ट होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. हजेरीच्या वादातून मुकादमाला मारहाण दरम्यान, सफाई कर्मचाऱ्यांच्या हजेरीच्या वादातून दोन दिवसांपूर्वी शहरातील पाच कंदील परिसरात मनपाच्या एका मुकादमाला दोन सफाई कर्मचाऱ्यांनी मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी संबंधितांविरुद्ध गुन्हाही दाखल करण्यात आला असल्याची माहिती आहे.

# पत्रकाराला कथित धमकीप्रकरणी ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ आक्रमक

## अप्पर पोलीस आयुक्त संजय जाधव यांची भेट; निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाईचे आश्वासन

जन सम्राट टाईम्स

**कल्याण । प्रतिनिधी :** डोंबिवलीतील रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बांधकाम सुरू असलेल्या इमारतीवरून पडून कामगाराचा मृत्यू झाल्याच्या गंभीर प्रकरणाची माहिती घेण्यासाठी गेलेल्या पत्रकारासोबत पोलिसांकडून कथित गैरवर्तन, शिवीगाळ आणि खोटा खंडणीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ने आक्रमक भूमिका घेतली असून संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर निष्पक्ष चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या संदर्भात सोमवारी दुपारी ४ वाजता व्हॉईस ऑफ मीडियाच्या पदाधिकाऱ्यांनी अप्पर पोलीस आयुक्त संजय जाधव यांची भेट घेऊन संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली. पत्रकारांशी कथित गैरवर्तन करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळल्यास कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. तपास अधिकाऱ्यांकडून कथित अरेरावीचा आरोप कामगाराच्या मृत्यूचे प्रकरण गंभीर असल्याने सत्य परिस्थिती जनतेसमोर यावी आणि तपासातील



महत्त्वाच्या बाबींची माहिती मिळावी, या उद्देशाने व्हॉईस ऑफ मीडिया सदस्य तथा ‘राष्ट्रभूमी भरारी’चे संपादक गौतम गवई हे रामनगर पोलीस ठाण्यात गेले होते. तपासाबाबत माहिती घेण्यासाठी आणि काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करण्यासाठी संबंधित तपासी अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, पोलीस उपनिरीक्षक प्रसाद चव्हाण यांनी कथितरित्या अरेरावीची भाषा वापरून शिवीगाळ केली तसेच पत्रकाराविरोधात खंडणीचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याचा आरोप संघटनेच्या निवेदनात करण्यात आला आहे. या आरोपांमुळे पत्रकार आणि पोलीस प्रशासन यांच्यातील संवादाचा मुद्दा ऐरणीवर आला असून, प्रकरणाची वस्तुनिष्ठ चौकशी करण्याची मागणी पत्रकार संघटनेकडून करण्यात आली आहे. “पत्रकारांशी गैरवर्तन गंभीर बाब” पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असून, गंभीर प्रकरणांची माहिती घेण्यासाठी पत्रकारांकडून प्रश्न विचारले जाणे ही त्यांच्या कामाचा भाग आहे. अशा वेळी पत्रकारांशी गैरवर्तन किंवा धमकीचे प्रकार घडणे ही गंभीर बाब असल्याचे व्हॉईस ऑफ मीडियाच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. चौकशी करून योग्य कारवाईचे आश्वासन व्हॉईस ऑफ मीडियाच्या पदाधिकाऱ्यांनी मांडलेल्या भूमिकेनंतर अप्पर पोलीस आयुक्त संजय जाधव यांनी प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. आता या चौकशीत नेमके काय निष्पन्न होते आणि संबंधित अधिकाऱ्यांवर प्रशासनाकडून कोणती कारवाई केली जाते, याकडे पत्रकारिता क्षेत्रासह सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी व्हॉईस ऑफ मीडिया महाराष्ट्र कोअर कमिटी सदस्य व ठाणे जिल्हा सुप्रिमो गौतम वाघ, महाराष्ट्र राज्य सहसंघटक सुरेश जगताप, जगन्नाथ जावळे, संतोष क्षेत्रे, रजनीकांत गायकवाड, ताराचंद तायडे, प्रशांत लक्ष्मण ढोणे, राजू दोंदे, देवानंद पाढेन, राजदीप जगताप यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# जळगाव जिल्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई!

## ११ लाख १७ हजारांचा अमली पदार्थ जप्त १ किलो ९६३ ग्रॅम एफेड्रिनसह २ किलो ११४ ग्रॅम गांजा हस्तगत

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी:** अमली पदार्थांची तस्करी व विक्री रोखण्यासाठी पोलिसांकडून सुरू असलेल्या धडक मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. स्थानिक गुन्हे शाखा (LCB) आणि एम.आय.डीसी. पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने कारवाई करत तब्बल ११ लाख १७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत एफेड्रिन आणि गांजा असा एकूण ४ किलो ०७७ ग्रॅम अमली पदार्थ जप्त करण्यात आला असून, एका ५५ वर्षीय व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले आहे. ही कारवाई ३१ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री सुमारे ११.४० वाजता एम.आय.डीसी. परिसरातील नारियलवाला बाबा दर्ग्यासमोरील रस्त्यावर करण्यात आली. गोपनीय माहितीवरून पोलिसांचा सापळा स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, एम.आय.डीसी. परिसरातून काळ्या रंगाच्या बर्गमॅन मोपेडवरून 'एफेड्रिन' या अमली पदार्थाची बेकायदेशीर वाहतूक होणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. एम.आय.डीसी. पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक अशोक मोहन काळे यांना कारवाईसाठी प्राधिकृत करण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या कायदेशीर परवानगीने राजपत्रित अधिकारी चंद्रकांत अरुण बोडरे आणि पंचांच्या उपस्थितीत सापळा रचण्यात आला. पोलिसांची चाहूल लागताच पळण्याचा प्रयत्न सापळ्यादरम्यान नूर मोहम्मद अब्दुल सलाम पटेल (वय ५५, रा. रामनगर, मेहरुण, जळगाव) हा मोपेडवरून येताना पोलिसांना दिसला. पोलिसांची चाहूल लागताच त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केल्याचे पोलिसांनी सांगितले. मात्र, पथकाने पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. पंचांसमक्ष त्याच्या ताब्यातील मोपेडच्या डिक्कीची झडती घेतली असता मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ आढळून आले. १.९६३ किलो एफेड्रिन; २.११४ किलो गांजा जप्त पोलिसांनी केलेल्या कारवाईत पुढील मुद्देमाल जप्त करण्यात आला— एफेड्रिन : १ किलो ९६३ ग्रॅम — अंदाजे किंमत ९ लाख ८१ हजार ५०० रुपये. गांजा : २ किलो ११४ ग्रॅम — अंदाजे किंमत १ लाख ५ हजार ७०० रुपये. बर्गमॅन मोपेड : काळ्या रंगाची दुचाकी, क्र. MH-19-EK-4305 — अंदाजे किंमत ३० हजार रुपये. एकूण जप्त मुद्देमाल : ४ किलो ०७७ ग्रॅम — अंदाजे किंमत ११ लाख १७ हजार २०० रुपये. प्राथमिक फॉरेन्सिक तपासणीत जप्त करण्यात आलेला रासायनिक पदार्थ 'एफेड्रिन', तर दुसरा पदार्थ 'गांजा' असल्याचे निष्पन्न



झाल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. NDPS कायद्यान्वये गुन्हा दाखल स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक दिपक प्रभाकर जगदाळे यांच्या फिर्यादीवरून आरोपी नूर मोहम्मद अब्दुल सलाम पटेल याच्याविरुद्ध एम.आय. डीसी. पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ०७०४/२०२६ नोंदविण्यात आला आहे. हा गुन्हा NDPS Act, 1985 मधील कलम ९(अ), २५(अ), ८(क) सह २०(ब)(ii) अन्वये दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संतोष काशिनाथ पवार करीत आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावीत आणि उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केली. अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात सुरू असलेल्या या कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध अमली पदार्थांच्या व्यवहारांवर पोलिसांनी लक्ष केंद्रित केल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणाच्या पुढील तपासातून अमली पदार्थांचा स्रोत आणि संभाव्य पुरवठा साखळी समोर येते का, याकडे आता लक्ष लागले आहे.अमली पदार्थांची तस्करी व विक्री रोखण्यासाठी पोलिसांकडून सुरू असलेल्या धडक मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. स्थानिक गुन्हे शाखा (LCB) आणि एम.आय.डीसी. पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने कारवाई करत तब्बल ११ लाख १७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत एफेड्रिन आणि गांजा असा एकूण ४ किलो ०७७ ग्रॅम अमली पदार्थ जप्त करण्यात आला असून, एका ५५ वर्षीय व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले आहे. ही कारवाई ३१ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री सुमारे ११.४० वाजता एम.आय.डीसी. परिसरातील नारियलवाला बाबा दर्ग्यासमोरील रस्त्यावर करण्यात आली. गोपनीय माहितीवरून पोलिसांचा सापळा स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, एम.आय.डीसी. परिसरातून काळ्या रंगाच्या बर्गमॅन मोपेडवरून 'एफेड्रिन' या अमली पदार्थाची बेकायदेशीर वाहतूक होणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. एम.आय.डीसी. पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक अशोक मोहन काळे यांना कारवाईसाठी प्राधिकृत करण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या कायदेशीर परवानगीने राजपत्रित अधिकारी चंद्रकांत अरुण बोडरे आणि पंचांच्या उपस्थितीत सापळा रचण्यात आला. पोलिसांची चाहूल लागताच पळण्याचा प्रयत्न सापळ्यादरम्यान नूर मोहम्मद अब्दुल सलाम पटेल (वय ५५, रा. रामनगर, मेहरुण, जळगाव) हा मोपेडवरून येताना पोलिसांना दिसला. पोलिसांची चाहूल लागताच त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केल्याचे पोलिसांनी सांगितले. मात्र, पथकाने पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स ब्रेक न्यूज ज

## गणेशोत्सव सांस्कृतिक पद्धतीने उत्सव साजरा करा : मुख्यमंत्री



जन सम्राट टाईम्स

**पुणे | प्रतिनिधी:** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर डीजेच्या वापरावरून सुरू असलेल्या चर्चेला आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनामुळे नवे वळण मिळाले आहे. पुण्यात आयोजित भाजपच्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुणेकरांनी डीजेच्या वादात न पडता गणेशोत्सव पूर्णपणे सांस्कृतिक पद्धतीने साजरा करावा, असे आवाहन केले. पुण्याची सांस्कृतिक परंपरा लक्षात घेता संपूर्ण महाराष्ट्राला आदर्श घालून देण्याची क्षमता पुणेकरांमध्ये असल्याचे त्यांनी नमूद केले. डीजेच्या वादात न पडता सांस्कृतिक उत्सवाचा आदर्श घाला गणेशोत्सवात डीजेचा वापर करावा की करू नये, यावर सध्या विविध स्तरांवर चर्चा सुरू आहे. ध्वनिप्रदूषण आणि नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता डीजेवर निर्बंध अथवा बंदी घालण्याची मागणीही पुढे येत आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुणेकरांना थेट आवाहन केले. "पुण्यामध्येच ही क्षमता आहे की संपूर्ण सांस्कृतिक पद्धतीने उत्सव साजरा केला पाहिजे. हे फक्त पुणेकरच करू शकतात," असे सांगत त्यांनी पुणेकरांनी डीजेच्या वादात न पडता महाराष्ट्राला सांस्कृतिक पद्धतीने गणेशोत्सव कसा साजरा करावा, हे दाखवून द्यावे, असे आवाहन केले. मुख्यमंत्र्यांच्या या विधानामुळे आगामी गणेशोत्सवात डीजेच्या वापराबाबत प्रशासनाची भूमिका काय राहणार, याकडेही आता लक्ष लागले आहे. मात्र, पुणेकरांनी स्वयंशिस्त आणि सांस्कृतिक परंपरेतून उत्सव साजरा करण्याचा आदर्श निर्माण करावा, असा संदेश त्यांच्या आवाहनातून देण्यात आला आहे. कार्यकारिणी बैठकीत विरोधकांवरही निशाणा भाजपच्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी विविध राजकीय आणि सामाजिक विषयांवर भाष्य केले. यावेळी त्यांनी विरोधकांवरही जोरदार टीका केली. राज्याच्या विकासाच्या मुद्द्यांबरोबरच भविष्यातील इंधनविषयक धोरणावरही त्यांनी महत्त्वपूर्ण विधान केले. देश सध्या पेट्रोल आणि डिझेलसाठी इतर देशांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. मात्र, आगामी काळात ही परिस्थिती बदलण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. येत्या २०३० पर्यंत देशाच्या इंधनाच्या गरजेपैकी ५० टक्के गरज शेतकरी भागवतील, तर उर्वरित ५० टक्के गरज ईव्ही अर्थात इलेक्ट्रिक वाहनांच्या माध्यमातून पूर्ण केली जाईल, असे फडणवीस यांनी सांगितले. पुण्याच्या परंपरेची जबाबदारी पुणेकरांवर पुण्याचा गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरेचा महत्त्वाचा भाग मानला जातो. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला दिलेले व्यापक स्वरूप आजही पुण्याच्या उत्सवाला वेगळी ओळख देते.

## स्त्री रुग्णालयाचे दिमाखात उद्घाटन

### मात्र रुग्णालयात नातेवाईकांनाच ओढावे लागते स्ट्रेचर

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी:** जिल्हा रुग्णालयातील स्त्री रुग्णालयाचे नुकतेच थाटामाटात उद्घाटन करण्यात आले. मात्र, उद्घाटनानंतरही गर्भवती महिलांना आवश्यक सुविधा मिळत नसल्याचा गंभीर आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने करण्यात आला आहे. तसेच हिरे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात वॉर्ड बॉय उपलब्ध नसल्याने गर्भवती महिलांच्या नातेवाईकांनाच स्ट्रेचर ओढून न्यावे लागत असल्याचा आरोपही शिवसेनेने केला आहे. प्रसूतीसाठी स्त्री रुग्णालयात आलेल्या काही महिलांना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने हिरे मेडिकल रुग्णालयात जाण्याचा सल्ला देण्यात आल्याचा दावा शिवसेनेने केला. मात्र, हिरे रुग्णालयात पोहोचल्यानंतरही वॉर्ड बॉय उपलब्ध नसल्याने गर्भवती महिलेच्या नातेवाईकांनाच स्ट्रेचर ओढून नेण्याची वेळ आल्याचे शिवसेनेने म्हटले आहे. रुग्णालयांचे उद्घाटन दिमाखात केले जाते; मात्र प्रत्यक्षात रुग्ण



आणि त्यांच्या नातेवाईकांना मूलभूत सुविधांसाठीही त्रास सहन करावा लागत असेल, तर अशा उद्घाटनाचा उपयोग काय? असा संतप्त सवाल शिवसेना उबाठा गटाने उपस्थित केला आहे. रुग्णालयातील अपुऱ्या सुविधांबाबत तातडीने दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, तसेच रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना योग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, या मागणीसाठी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आरोग्य सेवक सुरज भावसार, संदीप चौधरी, पंकज भारस्कर, सागर निकम, अजय चौधरी, गोकुळ बडगुजर, सागर साळवे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा रुग्णालयातील स्त्री रुग्णालयाचे नुकतेच थाटामाटात उद्घाटन करण्यात आले. मात्र, उद्घाटनानंतरही गर्भवती महिलांना आवश्यक सुविधा मिळत नसल्याचा गंभीर आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने करण्यात आला आहे. तसेच हिरे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात वॉर्ड बॉय उपलब्ध नसल्याने गर्भवती महिलांच्या नातेवाईकांनाच स्ट्रेचर ओढून न्यावे लागत असल्याचा आरोपही शिवसेनेने केला आहे. प्रसूतीसाठी स्त्री रुग्णालयात आलेल्या काही महिलांना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने हिरे मेडिकल रुग्णालयात जाण्याचा सल्ला देण्यात आल्याचा दावा शिवसेनेने केला.

## लासूर विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या व्हा. चेअरमनपदी नौमिन खा पठाण यांची बिनविरोध निवड

### संचालक व सभासदांकडून अभिनंदन

जन सम्राट टाईम्स

**चोपडा । (प्रतिनिधी):** लासूर, ता. चोपडा : लासूर येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लिमिटेडच्या व्हा. चेअरमनपदी श्री. नौमिन खा इब्राहिम खा पठाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवड प्रक्रियेदरम्यान सर्व संचालकांनी एकमताने त्यांच्यावर विश्वास व्यक्त करत त्यांच्या नावाला मंजुरी दिली. गावातील नम्रता पॅनलचे प्रमुख मा. नानासाहेब श्री. ए. के. गंभीर तसेच मा. आप्पासाहेब श्री. अमृतराव दत्तात्रेय वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली. नौमिन खा पठाण यांच्या निवडीमुळे सोसायटीच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास संचालक मंडळ व सभासदांनी व्यक्त केला. नौमिन खा पठाण यांनी यापूर्वीही सामाजिक तसेच सहकारी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले असून, त्यांच्या नेतृत्वाखाली सोसायटीच्या कामकाजाला अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली. निवडीनंतर नौमिन खा पठाण यांनी सर्व संचालक, सभासद



आणि हितचिंतकांचे आभार मानले. सोसायटीच्या सर्वांगीण विकासासोबतच शेतकरी आणि सभासदांच्या हिताच्या विविध योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. संचालक व मान्यवरांची उपस्थिती यावेळी सोसायटीचे चेअरमन श्री. योगेश दगडू वाघ, सचिव श्री. नारायण शिवराम पाटील, माजी व्हा. चेअरमन श्री. युवराज सीताराम बाविस्कर, माजी चेअरमन श्री. सुरेश उत्तम माळी, माजी व्हा. चेअरमन श्री. अरुण आनंदा देसले, माजी व्हा. चेअरमन श्री. प्रकाश राघो माळी, माजी व्हा. चेअरमन श्री. जगन्नाथ नारायण महाजन, संचालक श्री. महेंद्र नारायण पाटील, श्री. बाळू भिवसान सोनवणे, श्री. संदीप एकनाथ मगरे, श्री. अशोक रामदास बाविस्कर, श्रीमती जिजाबाई दगडू वाघ, श्री. राजेंद्र महादू माळी, तज्ञ संचालक श्री. दिलीप जानकीराम पालिवाल आदी उपस्थित होते. तसेच गावातील मान्यवर श्री. रमेश नथा पवार, श्री. तुषार दामोधर पाटील, श्री. गोकुळ रतन महाजन, श्री. प्रविण जगन्नाथ मगरे, श्री. जितेंद्र सुरेश महाजन, श्री. दीपक रतन महाजन, श्री. संजय श्रावण राजकुळे, श्री. विजय भागवत कोळी, श्री. नरेंद्र रघुनाथ महाजन, श्री. गोरख सीताराम पाटील, श्री. भरत सोनगीरे सर, श्री. तुषार दगडू वाघ, श्री. शशिकांत भगवान पवार, श्री. साखरलाल एकनाथ माळी, श्री. कैलास साखरलाल महाजन, माजी सरपंच श्री. देविलाल वाघू बाविस्कर, श्री. राजेंद्र कुंभार, श्री. वना पवार, श्री. अशोक नाना मुळीवाले, श्री. रईस खा पठाण, श्री. शरीफ मिस्तरी, श्री. सादिक दादा, श्री. सद्दाम खाटीक, श्री. शाहरुख खाटीक आणि श्री. नूर खा पठाण उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी नवनिर्वाचित व्हा. चेअरमन नौमिन खा इब्राहिम खा पठाण यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. जितेंद्र सुरेश महाजन यांनी केले.

## विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचा पाचोरा विभागीय कौटुंबिक मेळावा!

जन सम्राट टाईम्स

**पाचोर, । प्रतिनिधी:** तांत्रिक कामगार युनियनच्या पाचोरा विभागाच्या वतीने संघटनेच्या ४९ व्या वर्धापन दिनानिमित्त विभागीय व स्तरीय कौटुंबिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता भडगाव रोडवरील महालहपुरे मंगल कार्यालय येथे हा मेळावा होणार आहे. संघटनेच्या प्रदीर्घ वाटचालीतील ४९ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात तांत्रिक कामगार तसेच त्यांच्या कुटुंबीयांसाठी विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. एम. एन. खाटीक यांच्या हस्ते उद्घाटन या वर्धापन दिन सोहळ्याचे उद्घाटन कोकण प्रादेशिक अध्यक्ष मा. श्री. एम. एन. खाटीक यांच्या हस्ते होणार आहे. तर पाचोरा येथील प्रा. राजेंद्र चिंचोले हे प्रमुख प्रवक्ते म्हणून उपस्थित राहून कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमास पाचोरा-भडगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार किशोरआप्पा पाटील तसेच आर.आर.पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान झोन अध्यक्ष




गुलाबराव पवार भूषविणार आहेत. यावेळी कोकण प्रादेशिक संघटक एम. एन. खाटीक, प्रा. राजेंद्र चिंचोले आणि श्री. गजानन काकडे यांच्यासह विविध मान्यवरांची विशेष उपस्थिती राहणार आहे. कामगारांच्या प्रश्नांवर होणार चर्चा या कौटुंबिक मेळाव्यात विद्युत क्षेत्रातील तांत्रिक कामगारांच्या विविध ज्वलंत व प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा आणि मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच संघटनेत नव्याने दाखल होणाऱ्या सभासदांचे जाहीर स्वागत करून त्यांचा सत्कार केला जाणार आहे. कामगारांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठी उपलब्ध संधी, करिअर निवड आणि भविष्यातील शैक्षणिक वाटचाल याबाबतही मार्गदर्शन केले जाणार आहे. वीज कामगारांच्या सुरक्षिततेवर विशेष भर वीज क्षेत्रातील काम हे अत्यंत जोखमीचे असल्याने कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेचे नियम पाळणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे विद्युत कामगारांनी अपघात टाळण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी, सुरक्षा साधनांचा वापर कसा करावा आणि सुरक्षित पद्धतीने काम कसे करावे, याबाबत तांत्रिक मार्गदर्शन मेळाव्यात करण्यात येणार आहे. याशिवाय मुख्यालय स्तरावर सुरू असलेल्या विविध घडामोडी आणि संघटनेच्या कामकाजाची माहिती सर्व सभासदांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती केंद्राची संकल्पनाही राबविण्यात येणार आहे. कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन या मेळाव्याचे नियोजन विभागीय अध्यक्ष विजय चांदेकर, विभागीय सचिव रुपेश चव्हाण, विभागीय उपाध्यक्ष साहेबराव पाटील व तुकाराम चव्हाण, विभागीय सहसचिव मनोज पाटील, जयवंत पवार, अमोल पाटील तसेच विभागीय संघटक संदीप पाटील यांच्यासह सर्व पदाधिकारी व सभासदांकडून करण्यात येत आहे

## सर्वज्ञ महादेव मंदिर परिसर म्हणजे श्रद्धा प्रसन्नतेचा सुंदर संगम : पालकमंत्री

### चौथ्या वर्धापन दिनानिमित्त हनुमान मंदिराची स्थापना; मान्यवरांच्या हस्ते 'संत कुटिया'चे अनावरण

जन सम्राट टाईम्स

**जळगाव। प्रतिनिधी:** शहरातील गट क्रमांक ५४, शिव कॉलनी येथील सर्वज्ञ महादेव मंदिराच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त हनुमान मंदिराची स्थापना तसेच 'संत कुटिया'च्या अनावरणाचा सोहळा भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात पार पडला. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील, प. पू. पद्मनाभन महाराज, रामेश्वर महाराज आणि प. पू. भक्तीप्रियदासजी स्वामी यांच्या हस्ते 'संत कुटिया'चे अनावरण करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. साधू-संत आणि भाविकांच्या उपस्थितीने संपूर्ण



मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. सर्वज्ञ महादेव मंदिर परिसरात प्रवेश करताच मनाला वेगळीच प्रसन्नता आणि शांतता लाभते. अध्यात्म, सात्त्विकता, स्वच्छता आणि सुंदरता यांचा सुरेख संगम येथे साधला आहे, अशा शब्दांत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी मंदिर परिसराचे कौतुक केले. त्यांनी मंदिर परिसराची पाहणी करून तेथील धार्मिक आणि आध्यात्मिक वातावरणाबद्दल समाधान व्यक्त केले. "मंदिरे ही केवळ श्रद्धेची स्थाने नसून समाजाला संस्कार, सद्विचार आणि माणुसकीची प्रेरणा देणारी ऊर्जाकेंद्रे आहेत. अशा धार्मिक स्थळांमुळे समाजात श्रद्धा, एकोपा आणि सद्भावनेची भावना अधिक दृढ होते," असे प्रतिपादन पालकमंत्री पाटील यांनी केले. यावेळी त्यांनी उपस्थित साधू-संतांचे स्वागत करून त्यांचे आशीर्वाद घेतले. सर्वज्ञ महादेव मंदिराच्या चौथ्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित या सोहळ्यात हनुमान मंदिराची विधिवत स्थापना करण्यात आली. विविध धार्मिक विधी, साधू-संतांचे सान्निध्य आणि भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे मंदिर परिसरात भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचे प्रसन्न वातावरण निर्माण झाले होते. मान्यवरांची उपस्थिती या सोहळ्यास माजी नगरसेवक विशाल भोळे, ट्रस्टचे मार्गदर्शक रत्नाकर आप्पा झांबरे, अध्यक्ष मयूर गुर्जर, उपाध्यक्ष शेखर सोनार, सचिव प्रीतम गुजर यांच्यासह शिवपुरी गोसावी, किशोर चौधरी, सुनील जोशी, भगवान पाटील, अभय कुलकर्णी, हरिप्रसाद कुशवाह, शामराव वालडे, महेश महाजन, के. एम. बापू, कमलाकर पाटील, अनिल पाटील, सुधीर सोनार, प्रवीण कोलते, दिनेश शिंपी, जितेंद्र झांबरे, किरण गोसावी, केदारनाथ ठाकूर, रमेश कुशवाह, शरद बोरसे, भगवान वालडे, पंकज कुशवाह, सुनील पाटील, दीपक गुलाब बोरसे, प्रदीप महाले, अनिरुद्ध कुशवाह, दुर्गेश साळुंखे, बंटी बोरसे, राहुल पाटील, प्रणय झांबरे, पियुष कुशवाह आणि कैलास चौधरी यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोहळ्याच्या यशस्वितेसाठी उपस्थितांनी विविध स्वरूपात सेवा दिली. 'हर हर महादेव' आणि 'जय हनुमान'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. साधू-संतांचे सान्निध्य, भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि भक्तीचा जागर यामुळे सर्वज्ञ महादेव मंदिराचा चौथा वर्धापन दिन श्रद्धा, संस्कार आणि अध्यात्माचा मंगलमय सोहळा ठरला.

## फेकरीत पॉवर लिफ्टिंग बेंच प्रेस स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी:** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून फेकरी येथील जिल्हा परिषद शाळेत फ्रेंड्स क्लबच्या वतीने पॉवर लिफ्टिंग खुली बेंच प्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावल, रावेर आणि भुसावळ तालुक्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. खेळाडूंनी आपल्या ताकदीचे उत्कृष्ट प्रदर्शन करत स्पर्धेत रंगत आणली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकारण निकम यांनी केले. यावेळी फ्रेंड्स क्लबचे अध्यक्ष निशांत निकम, उल्हास बोरोले, प्रकाश सरदार, सिद्धार्थ निकम, महेंद्र चव्हाण, रमेश निकम, अन्वर शेख, योगेश सोनवणे, सिद्धार्थ मेढे, किरण हातोले आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पदके प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी विजेत्यांसह सर्व सहभागी खेळाडूंच्या कामगिरीचे कौतुक करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी फेकरी येथील फ्रेंड्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी गेल्या दोन महिन्यांपासून अथक परिश्रम घेतले. स्थानिक क्रीडाप्रेमींनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी महेंद्र चव्हाण सर यांनी सर्व सहभागी खेळाडू, मान्यवर पाहुणे आणि उपस्थितांचे आभार मानले. या स्पर्धेमुळे फेकरी परिसरासह यावल, रावेर आणि भुसावळ तालुक्यात पॉवर लिफ्टिंग या क्रीडाप्रकाराला अधिक चालना मिळण्यास मदत होईल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# भावी इंजिनिअर्सच्या नव्या प्रवासाचा शुभारंभ!

## व्ही. बी. कोलते इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये इंडक्शन प्रोग्राम व पालक सभा उत्साहात

जन सम्राट टाईम्स

**मलकापूर । प्रतिनिधी:** स्थानिक लोकसेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. व्ही. बी. कोलते कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, मलकापूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या नवप्रविष्ट विद्यार्थ्यांसाठी विशेष 'इंडक्शन प्रोग्राम' आणि 'पालक सभा' उत्साही, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. अनिल खर्चे, संस्थेचे सचिव डॉ. अरविंदजी कोलते, कोषाध्यक्ष सुधीरभाऊ पाचपांडे, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह डीन डॉ. युगेश खर्चे, आयक्यूएसी को-ऑर्डिनेटर प्रा. आर. एम. चौधरी आणि कार्यक्रम समन्वयक प्रा. मोहम्मद जावेद यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच विविध विभागांचे विभागप्रमुख प्रा. एन. ए. खर्चे, प्रा. एस. एल. फरपट, प्रा. वाय. पी. सुशिर आणि प्रा. एस. एम. भोळे मंचावर उपस्थित होते. विविध वृत्तपत्रांचे पत्रकार, महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, नवप्रविष्ट विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'दामिनी पथका'च्या उपस्थितीत महिला सुरक्षेबाबत जनजागृती विद्यार्थिनी आणि महिलांच्या सुरक्षेबाबत जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने कार्यक्रमाला 'दामिनी पथका'च्या अधिकाऱ्यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी महाविद्यालयाच्या वतीने प्रा. संगीता खर्चे यांच्या हस्ते दामिनी पथकातील सदस्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा. एस. डी. लवंगे यांनी केले. त्यांनी उपस्थितांचे स्वागत करून दिवसभरातील कार्यक्रमांची रूपरेषा मांडली. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडविण्यावर भर ॲडमिनिस्ट्रेटिव्ह डीन डॉ. युगेश खर्चे यांनी '३६०° स्टुडंट : नीड ऑफ द अवर' या विषयावर मार्गदर्शन केले. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून विद्यार्थ्यांनी अष्टपैलू व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासोबतच तांत्रिक कौशल्ये आणि व्यवहारज्ञान आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर प्रा. आर. एम. चौधरी यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक प्रवासासाठी प्रोत्साहित केले. संस्थेचे सचिव डॉ. अरविंदजी कोलते यांनी 'समाज, राष्ट्र, संस्कृती आणि नवसंशोधन' या विषयावर मार्गदर्शन केले. तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करून विद्यार्थ्यांनी राष्ट्रविकासात योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खर्चे यांनी अध्यक्षीय मनोगतातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिस्त, सातत्यपूर्ण मेहनत आणि ध्येयपूर्तीसाठी मार्गदर्शन केले. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आचल गोळे यांच्या नियोजनाखाली महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात आला. पहिल्या सत्राच्या समारोपावेळी प्रा. राधिका एस. बिहाडे यांनी आभार मानले. यानंतर उपस्थित पाहुणे, पालक आणि विद्यार्थ्यांसाठी स्नेह-अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. पालकांशी शाखानिहाय संवाद अल्पोपहारानंतर विशेष पालक सभेचे आयोजन करण्यात आले. पालकांनी शाखानिहाय निश्चित केलेल्या दालनांमध्ये जाऊन संबंधित विभागप्रमुखांशी थेट संवाद साधला. यावेळी महाविद्यालयाची शैक्षणिक पद्धती, उपस्थितीचे नियम, परीक्षा पद्धती तसेच उपलब्ध सोयी-सुविधांची पालकांना सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यामध्ये प्रा. सचिन बोरले, प्रा. बुद्धप्रिय गोपनारायण, प्रा. पूनम पठ्ठे, प्रा. दीप्ती लढे, प्रा. योगेश पाटील, प्रा. भाग्यश्री नारखेडे, प्रा. अंकुश नारखेडे, प्रा. नितीन भारांबे, प्रा. शारदा लांडे तसेच अनंता बराटे, सचिन कोलते, प्रतीक हांडगे, तुषार पाटील, अंकित वाघोदे आणि राहिल खान आदींनी मोलाचे योगदान दिले. स्थानिक लोकसेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. व्ही. बी. कोलते कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, मलकापूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या नवप्रविष्ट विद्यार्थ्यांसाठी विशेष 'इंडक्शन प्रोग्राम' आणि 'पालक सभा' उत्साही, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. अनिल खर्चे, संस्थेचे सचिव डॉ. अरविंदजी कोलते, कोषाध्यक्ष सुधीरभाऊ पाचपांडे, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह डीन डॉ. युगेश खर्चे, आयक्यूएसी को-ऑर्डिनेटर प्रा. आर. एम. चौधरी आणि कार्यक्रम समन्वयक प्रा. मोहम्मद जावेद यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच विविध विभागांचे विभागप्रमुख प्रा. एन. ए. खर्चे, प्रा. एस. एल. फरपट, प्रा. वाय. पी. सुशिर आणि प्रा. एस. एम. भोळे मंचावर उपस्थित होते. विविध वृत्तपत्रांचे पत्रकार, महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, नवप्रविष्ट विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने प्रा. संगीता खर्चे यांच्या हस्ते दामिनी पथकातील सदस्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## महेश अर्बन क्रेडिट सोसायटीची वार्षिक सभा उत्साहात संपन्न



जन सम्राट टाईम्स

**मलकापूर | प्रतिनिधी :** महेश अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी, मलकापूरची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी बुलढाणा रोडवरील संपूर्ण लॉन येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. संस्थेचे अध्यक्ष मख्खनलाल मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला संचालक मंडळासह सभासद, ठेवीदार आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी दिवंगत सभासद तसेच राष्ट्रसेवा आणि सामाजिक क्षेत्रात कर्तव्य बजावताना शहीद झालेल्या जवान व पोलिस अधिकाऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर संस्थेचे उपाध्यक्ष किशोरजी बाहेती यांनी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा आर्थिक अहवाल व पत्रक सभासदांसमोर सादर केला. सभासदांनी त्यास मंजुरी दिली. आर्थिक प्रगतीचा आलेख उंचावला महेश अर्बन क्रेडिट सोसायटीने गेल्या ३७ वर्षांत आर्थिक प्रगतीसोबतच सामाजिक बांधिलकीची परंपराही जपली आहे. संस्थेकडे सुमारे ४९.५३ कोटी रुपयांच्या ठेवी, ३७.७९ कोटी रुपयांचे कर्जवाटप आणि १८.७४ कोटी रुपयांची गुंतवणूक आहे. संस्थेचे भागभांडवल सुमारे १.७३ कोटी रुपये असून आतापर्यंत ८.९० कोटी रुपयांचा निधी उभारण्यात आला असल्याची माहिती सभेत देण्यात आली. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेला ३७.३४ लाख रुपयांचा नफा झाला असून सभासदांना १० टक्के लाभांश देण्याचे जाहीर करण्यात आले. या निर्णयामुळे सभासदांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. सामाजिक बांधिलकीची परंपरा कायम संस्थेचे अध्यक्ष मख्खनलाल मुंदडा यांनी संस्थेच्या सामाजिक बांधिलकीवर प्रकाश टाकत विविध उपक्रमांची माहिती दिली. संस्थेच्या सभासदांसाठी १ लाख रुपयांची जनता विमा पॉलिसी सुरू करण्यात आली आहे. तसेच सभासदांच्या कुटुंबीयांना अंत्यसंस्कारासाठी आर्थिक मदत, मेडिकल कॅम्प, गोसेवा आदी सामाजिक उपक्रमांनाही संस्थेकडून सहकार्य केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. सभेदरम्यान काकासाहेब दीक्षित प्रशिक्षण केंद्र, अकोला येथील पी. यू. गोपनारायण यांनी सभासदांना मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले. त्यानंतर झालेल्या खुल्या चर्चेत सभासद व पदाधिकाऱ्यांनी विविध विषयांवर आपले विचार मांडले. नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार यावेळी मलकापूर नगरपरिषदेत निवडून आलेले किसनराव पाटील, दुर्गेश राजापूर यांचा संस्थेच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सभेच्या समारोपप्रसंगी व्यवस्थापक सुनील अग्रवाल यांनी उपस्थितांचे आभार मानले.

---

## भडगाव तहसील कार्यालयासमोरील प्रहार दिव्यांग संघटनेचे उपोषण लेखी आश्वासनाने मागे

### पाच-सहा महिन्यांपासून मानधन थकीत

जन सम्राट टाईम्स

**भडगाव । प्रतिनिधी:** दिव्यांग बांधवांचे पाच ते सहा महिन्यांपासून थकीत असलेले संजय गांधी निराधार योजनेचे मानधन तातडीने अदा करावे, तसेच पात्र दिव्यांगांना अंत्योदय रेशन कार्ड योजनेत समाविष्ट करावे, या प्रमुख मागण्यांसाठी प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने भडगाव तहसील कार्यालयासमोर सुरू करण्यात आलेले उपोषण प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर दुपारी मागे घेण्यात आले. दि. १ रोजी सकाळी ११ वाजता या उपोषणाला सुरुवात झाली. यावेळी संघटनेचे पदाधिकारी, दिव्यांग बांधव आणि महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उपोषणस्थळी विविध मागण्यांच्या समर्थनार्थ घोषणाही देण्यात आल्या. संघटनेने यापूर्वीच तहसीलदार शीतल सोलाट यांना उपोषणाचा इशारा देणारे निवेदन दिले होते. मानधनासाठी दिव्यांगांच्या तहसील कार्यालयात चकरा तालुक्यातील पात्र दिव्यांग



बांधवांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनही अनेकांना मागील पाच ते सहा महिन्यांपासून संजय गांधी योजनेचे मानधन मिळालेले नाही. मानधनासाठी दिव्यांग बांधवांना तहसील कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागत असून, त्यांना 'पोर्टल बंद आहे' असे उत्तर दिले जात असल्याचा आरोप संघटनेने केला. पोर्टल सुरू करण्याबाबत प्रशासकीय स्तरावर अद्याप ठोस पाठपुरावा झालेला नसल्याचेही संघटनेने निवेदनात म्हटले आहे.

त्यामुळे थकीत मानधन तातडीने मिळावे, अशी मागणी करण्यात आली. अंत्योदय योजनेत समावेशाची मागणी दिव्यांग बांधवांनी अंत्योदय रेशन कार्डासाठी पुरवठा शाखेकडे आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनही तालुक्यातील तसेच शहरातील अनेक पात्र दिव्यांगांना अंत्योदय योजनेत समाविष्ट करण्यात आलेले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. शासनाच्या संबंधित परिपत्रकानुसार पात्र दिव्यांगांना योजनेचा लाभ मिळणे अपेक्षित असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. दिव्यांगांच्या विविध योजनांच्या बाबतीत तहसील कार्यालयाची उदासीनता दिसून येत असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला. अधिकाऱ्यांची उपोषणस्थळी भेट उपोषणस्थळी संजय गांधी योजना तहसीलदार रमेश देवकर यांनी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी चर्चा केली.

---

## १७–१८ वर्षांच्या अथक संशोधन प्रवासाला ऐतिहासिक पूर्णविराम!

### खंड २'ठरणार दीर्घ संशोधनकार्याची अखेरची खूण

जन सम्राट टाईम्स

**नाशिका (प्रतिनिधी):** तब्बल १७–१८ वर्षे उत्तर महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास शोधण्याचे, त्याचे दस्तऐवजीकरण करण्याचे आणि तो पुढील पिढ्यांसाठी जतन करण्याचे काम केल्यानंतर या प्रदीर्घ संशोधनप्रवासाला आता पूर्णविराम देण्याची वेळ आली आहे. आर्थिक अडचणींमुळे यापुढे अशाच व्यापक आणि प्रदीर्घ संशोधन प्रकल्पांना हात घालता येणार नसल्याची खंत संशोधकांनी व्यक्त केली आहे. आयुष्याचा मोठा काळ, वेळ, श्रम आणि मनःपूर्वक ऊर्जा ज्या कार्यासाठी वाहिली, त्या संशोधनाची वाटचाल आता थांबवावी लागत असल्याची भावना मनाला वेदना देणारी असली, तरी या कार्याकडे केवळ शेवट म्हणून पाहता येणार नाही. उलट, उत्तर महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीच्या इतिहासाचे दस्तऐवजीकरण करण्याची एक महत्त्वाची ऐतिहासिक जबाबदारी पूर्णत्वास नेल्याचे समाधान या प्रवासामागे आहे. उत्तर महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास हा केवळ कागदावर शब्दबद्ध केलेला इतिहास नाही. तो असंख्य कार्यकर्त्यांच्या संघर्षाचा, त्यागाचा, स्वप्नांचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या ध्यासाचा जिवंत दस्तऐवज आहे. अनेक कार्यकर्त्यांच्या आठवणी, संघर्षकथा, चळवळीतील योगदान आणि सामाजिक परिवर्तनासाठी केलेले प्रयत्न काळाच्या ओघात विस्मृतीत जाऊ नयेत, यासाठी या संशोधनातून त्यांना शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला. काही स्वप्ने अपूर्ण; मात्र ऐतिहासिक जबाबदारी पूर्ण प्रदीर्घ संशोधनप्रवासात अनेक अडचणींचा सामना करावा लागला. काही स्वप्ने अपूर्ण राहिली, काही संकल्पांना परिस्थितीच्या मर्यादा आल्या; मात्र ज्या कार्यासाठी आयुष्याचा मोठा काळ समर्पित केला, त्या कार्यातून पुढील पिढ्यांसाठी इतिहासाचा ठेवा निर्माण करता आला, हेच सर्वात मोठे समाधान असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे. "या प्रवासात बरेच काही गमावले असेल, अनेक अडचणी सोसल्या असतील; पण आंबेडकरी चळवळीच्या इतिहासातील काही पाने काळाच्या विस्मृतीत जाण्यापासून वाचवता आली, यापेक्षा मोठे समाधान दुसरे कोणते?" अशी भावनिक भावना या संशोधनप्रवासाच्या समारोपाच्या निमित्ताने व्यक्त करण्यात आली. 'नाशिक जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळ – खंड २'कडे लक्ष आता या प्रदीर्घ प्रवासातील शेवटचा टप्पा म्हणून 'नाशिक जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळ – खंड २' या ग्रंथाची प्रतीक्षा आहे. हा ग्रंथ केवळ पाचवा ग्रंथ नसून, १७–१८ वर्षांच्या दीर्घ संशोधनप्रवासाची अखेरची खूण, असंख्य कार्यकर्त्यांच्या स्मृतींना वाहिलेली आदरांजली आणि पुढील पिढ्यांसाठी जतन केलेला वैचारिक वारसा म्हणून पाहिला जात आहे. या ग्रंथाच्या माध्यमातून आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांचा संघर्ष, त्यांचे योगदान आणि सामाजिक परिवर्तनाची वाटचाल पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्रवास थांबेल; इतिहास मात्र बोलत राहील.

---

## नशिराबाद नगरपरिषदेत अजब कारभार! शिस्तीचा पाठ देणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांकडेच 'आयडी कार्ड' गायब

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद । प्रतिनिधी: नशिराबाद नगरपरिषदेचा कारभार शिस्तीऐवजी मनमानी पद्धतीने चालल्याचे पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) वतीने स्थानिक नागरिकांच्या विविध प्रलंबित व जिव्हाळ्याच्या प्रश्नांचे निवेदन नशिराबाद नगरपरिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यांना देण्यात आले. मात्र, आश्चर्य म्हणजे, हे निवेदन स्वीकारत असताना खुद्द मुख्य अधिकाऱ्यांच्याच छातीवर किंवा गळ्यात कोणतेही अधिकृत ओळखपत्र लावलेलंच नव्हते. शासकीय कार्यालयांमध्ये पारदर्शकता असावी, कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी कोण आहे हे स्पष्ट व्हावे, यासाठी प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याने व अधिकाऱ्याने आपले अधिकृत ओळखपत्र सक्तीने बाळगणे आणि ते दृश्यमान ठेवणे बंधनकारक असते. शासन स्तरावरून याविषयी वारंवार कठोर निर्देश दिले जातात. एकीकडे सामान्य नागरिकांवर नियमांचा बडगा उगारला जातो आणि साध्या कामांसाठीही चकरा मारायला लावल्या जातात, तर दुसरीकडे खुद्द नगरपरिषदेचे प्रमुखच नियमांचे उल्लंघन करताना दिसतात. ज्या अधिकाऱ्याला स्वतःच्या अंगावर अधिकृत ओळखपत्र लावण्याचे भान नाही, ते अधिकारी शहरातील विकास आणि शिस्त काय राखणार? असा संतप्त सवाल आता नशिराबादमधील सुजाण नागरिकांमधून व मनसे कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकारामुळे अधिकारी वर्गातील बेजबाबदार वृत्ती पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली असून, यावर वरिष्ठ अधिकारी काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

## संस्कृतीचा उत्सव; संभाजीनगरात जिल्हा मराठी साहित्य संमेलन!

जन सम्राट टाईम्स

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि साहित्यधारा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अनुदानातून आयोजित करण्यात येणारे हे दोन दिवसीय संमेलन २८ आणि २९ नोव्हेंबर २०२६ रोजी संपन्न होणार आहे. संमेलनाची सुरुवात ग्रंथदिंडीने होणार असून, त्यानंतर स्मरणिका व पुस्तक प्रकाशन, कथाकथन, कवी संमेलन, नाटक, एकांकिका, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच परिसंवाद अशा विविध साहित्यिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून साहित्य, कला आणि संस्कृतीचा सुरेख आविष्कार रसिकांना अनुभवता येणार आहे. परिसंवादासाठी 'बाल साहित्य : बालसाहित्याचे बदलते स्वरूप, त्यासमोरील आव्हाने तसेच भविष्यातील वाटचाल यावर या परिसंवादातून विचारमंथन होणार आहे. यासोबतच एका ख्यातनाम व्यक्तीची विशेष मुलाखत आयोजित करण्यात येणार असून, साहित्य व कलाक्षेत्रातील मान्यवरांसह काही नामवंत सिने कलावंतांनाही संमेलनासाठी निमंत्रित करण्यात येणार आहे. त्यामुळे साहित्यप्रेमी आणि रसिकांसाठी हे संमेलन वैचारिक मेजवानीसोबतच कला आणि संस्कृतीचा अविस्मरणीय अनुभव ठरणार आहे. या जिल्हा मराठी साहित्य संमेलनाचे मुख्य आयोजक साहित्यधारा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ. संघर्ष सावळे आहेत. लेखक, कवी, साहित्यिक, कलाकार, विद्यार्थी तसेच साहित्यप्रेमी आणि रसिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या साहित्य सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि साहित्यधारा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अनुदानातून आयोजित करण्यात येणारे हे दोन दिवसीय संमेलन २८ आणि २९ नोव्हेंबर २०२६ रोजी संपन्न होणार आहे.


---

## परभणीत विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षणांतर्गत प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

### मतदारांनी नाव व तपशील तपासून आवश्यक अर्ज करण्याचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**परभणी । प्रतिनिधी:** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण-२०२६ (SIR) अंतर्गत परभणी जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आली. मतदारांनी प्रारूप यादीतील आपले नाव, पत्ता व इतर तपशील तपासून त्रुटी असल्यास किंवा पात्र असूनही नाव समाविष्ट नसल्यास ३० सप्टेंबर २०२६पर्यंत दावे व हरकती दाखल कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले. अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध होणार आहे.



प्रारूप मतदार यादीच्या प्रसिद्धीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत उपजिल्हाधिकारी (निवडणूक) अरुणा संगेवार तसेच मान्यता प्राप्त राष्ट्रीय व राज्यस्तरीय राजकीय पक्षांचे अध्यक्ष, सचिव आणि अधिकृत प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना प्रारूप मतदार यादीची प्रत सुपूर्द करण्यात आली. बैठकीत दावे व हरकती दाखल करण्याची प्रक्रिया, No Mapping, Anomaly, अनुपस्थित/शोधूनही न सापडलेले, कायमस्वरूपी स्थलांतरित, मयत, अन्यत्र मतदार म्हणून नोंद/डुप्लिकेट (ASDD) तसेच Uncollectable EFs संदर्भातील कार्यवाहीची माहिती देण्यात आली.

जिल्ह्यात १५ लाख ४१ हजार ७ मतदार २४ ऑगस्ट २०२६च्या SIR Status Reportनुसार परभणी जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघांत एकूण १५ लाख ४१ हजार ७ मतदार असून १,६२३ बीएलओ कार्यरत आहेत. सर्व बीएलओंकडून EF फॉर्म डाउनलोड, छपाई आणि वितरणाची प्रक्रिया १०० टक्के पूर्ण झाली आहे. यापैकी १३ लाख ६० हजार ७५८ EFचे डिजिटायझेशन व पडताळणी पूर्ण झाली असून त्याचे प्रमाण ८८.३० टक्के आहे. जिल्ह्यात १ लाख ८० हजार २४९ Uncollectable EFs, १६ हजार ४२८ No Mapping आणि ५ हजार ३२८ Anomaly नोंदी असल्याची माहिती देण्यात आली. विधानसभा मतदारसंघनिहाय No Mapping व Anomaly No Mapping नोंदींमध्ये जिंतूरमध्ये २,६७५, परभणीत ८,७४०, गंगाखेडमध्ये १,३८७ आणि पाथरीमध्ये ३,६२६ नोंदी आहेत. जिल्ह्यातील एकूण No Mapping नोंदी १६,४२८ आहेत. Anomaly नोंदींमध्ये जिंतूरमध्ये १,५७२, परभणीत ५२६, गंगाखेडमध्ये १,०११ आणि पाथरीमध्ये २,२१९ नोंदी असून जिल्ह्यातील एकूण Anomaly नोंदी ५,३२८ आहेत. १ लाख ८० हजार २४९ Uncollectable EFsचे वर्गीकरण Uncollectable EFsचे प्राथमिक वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे: हे वर्गीकरण अंतिम नसून प्रारूप स्वरूपाचे आहे. दावे-हरकती, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी आणि सक्षम प्राधिकाऱ्याच्या निर्णयानंतर अंतिम कार्यवाही केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. No Mapping म्हणजे नाव वगळलेच असे नाही SIR प्रक्रियेत No Mapping म्हणून नोंद झालेल्या १६,४२८ प्रकरणांबाबत प्रशासनाने महत्त्वाचे स्पष्टीकरण दिले आहे. No Mapping असणे म्हणजे संबंधित मतदार अपात्र ठरला किंवा त्याचे नाव अंतिम मतदार यादीतून निश्चितपणे वगळण्यात आले, असा अर्थ नाही. संबंधित प्रकरणांची आवश्यक पडताळणी करून गरजेनुसार सुनावणी घेण्यात येणार आहे. मतदारांना आपली पात्रता सिद्ध करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे व पुरावे सादर करण्याची संधी दिली जाणार आहे. उपलब्ध अभिलेख व कागदपत्रांच्या आधारे सक्षम प्राधिकाऱ्याकडून कारणयुक्त निर्णय घेण्यात येईल.